आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
८ एप्रिल २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांवरच्या पोषक तत्त्वांवर आधारित अनुदान दरांना केंद्र सरकारची मंजुरी

- देशात कोळसा, गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असल्याची सरकारची ग्वाही

- व्याजदर जैसे थे ठेवण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, युद्धाच्या परिणामांबाबत सावध पवित्रा

- भोंदू बाबा अशोक खरातला आणखी एका बलात्कार प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

आणि

- आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधूचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**<><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांसाठी पोषक तत्त्वांवर आधारित अनुदान दरांना केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. त्यासाठी ४१ हजार ५३३ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागणार असल्याचं माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत अनुदानात चार हजार ३१७ कोटी रुपयांची वाढ केली आहे.

- **- - होल्ड - - -(१६ सेकंद)**

त्याबरोबर सरकारनं आज ४१ किलोमीटरच्या जयपूर मेट्रोच्या प्रल्हादपूर ते तोडी मोड या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी दिली. HPCL राजस्थान रिफायनरी लिमिटेड म्हणजेच HRRL 'प्रकल्पाच्या सुधारित खर्चाला तसंच अरुणाचल प्रदेशातल्या 'कमला जलविद्युत प्रकल्पा'च्या बांधकामासाठी २६ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीलाही मंत्रिमंडळ समितीनं मान्यता दिली.

**<><><><><>**

इराण विरुद्ध अमेरिका आणि इस्त्राएल दरम्यान तात्पुरत्या युद्धबंदीचं भारतानं स्वागत केलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत

आंतरमंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितलं की पश्चिम आशियात शाश्वत शांतता नांदावी अशी भारताची भूमिका आहे. आता होर्मुझमधून जलवाहतूक सुरळीत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**- - - होल्ड - -(१२ सेकंद)**

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमध्येही देशाच्या कोळसा खाणींमध्ये आणि वीज निर्मिती केंद्रांमध्ये कोळशाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं कोळसा मंत्रालयाचे संयुक्त सचिव संजीव कुमार कास्सी यांनी सांगितलं. कोळशाच्या दरात कोणतीही वाढ झाली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅस पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून त्याचा नियमित पुरवठा होत असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयांच्या सचिव सुजाता शर्मा यांनी यावेळी दिली. देशात जहाज आणि जलवाहतूक सुरळीत सुरु असून कुठेही जहाजांची कोंडी झालेली नसल्याची माहिती बंदरे आणि जलवाहतूक मंत्रालयाचे सहसचिव मुकेश मंगल यानी यावेळी दिली.

**<><><><><>**

डेटा सेंटरमधली प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तात्काळ बँडविड्थ वाढवण्याची क्षमता शासनाच्या विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणीदरम्यान अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. मुंबईत त्यांच्या वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स कंपनीच्या एमबी३ डेटा सेंटरचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीनं यवतमाळ इथं उभारण्यात आलेल्या २६ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या या केंद्रात वापरल्या जाणाऱ्या उर्जेपैकी सुमारे ६० टक्के ऊर्जा या सौर प्रकल्पातून मिळते.

**<><><><><>**

आजपासून येत्या १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह, विविध प्रबोधनात्मक आणि समाजोपयोगी उपक्रमांनी राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांना अभिवादन करण्यासाठी ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत संयुक्त जयंती सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. या दरम्यान 'नवीन ग्रंथालय' येथे दुर्मिळ ग्रंथ आणि पुस्तक प्रदर्शन, व्याख्याने, महात्मा फुले यांच्या विचारधारेवर राज्यस्तरीय परिसंवाद, भीमगीत स्पर्धा, 'घटनात्मक न्यायशास्त्र' विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आणि विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा आणि 'खुले पत्रलेखन' अशा वैविध्यपूर्ण उपक्रमांचा समावेश आहे. भंडारा जिल्ह्यात या सप्ताहानिमित्त वक्तृत्व, निबंध, लघुनाट्य स्पर्धा, महिला मेळावे, व्याख्यान, प्रबोधनपर कार्यक्रम, रक्तदान शिबिर आणि स्वच्छता अभियान आदी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं व्याजदर जैसे-थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पतधोरण आढावा समितीच्या ३ दिवसीय बैठकीत झालेले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. त्यानुसार रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीनं एकमतानं घेतल्याचं त्यांनी सांगितलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**- होल्ड व्हाइस कास्ट - - --(२० सेकंद)**

*(गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवर तर चालू आर्थिक वर्षात हा दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील, अशी शक्यता रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केली आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर ४ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असाही रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. पश्चिम आशियातल्या युद्धामुळे वाढलेल्या इंधनाच्या किंमती, एल निनोमुळे देशातल्या पावसावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता यामुळं महागाईचा दर वाढू शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.*

*पश्चिम आशियातल्या संघर्षामुळं देशाच्या आर्थिक वृद्धीदरावर विपरीत परिणाम होईल, असं मत गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मांडलं आहे. या संघर्षावर* wait and watch *अशी भूमिका घेतानाच तिकडच्या परिस्थिती बाबत सजग राहून संभाव्य आव्हानांवर लक्ष ठेवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतल्याचं गव्हर्नर म्हणाले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असून पूर्वी पेक्षा*

*परिस्थिती अधिक चांगली असल्याचंही त्यांनी नमूद केलं. युद्धाच्या काळात सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांमुळं युद्धाचा परिणाम कमी व्हायला मदत झाल्याचंही ते म्हणाले.*

*आधीच्या आर्थिक वर्षांच्या तुलनेत गेल्या आर्थिक वर्षात रुपयाचं अवमूल्यन अधिक झाल्याचं त्यांनी आज सांगितलं. परकीय चलन बाजारपेठेत अतिरीक्त हस्तक्षेप न करण्याची रिझर्व्ह बँकेची भूमिका कायम असून रुपयाच्या विनिमय दरासाठी कुठलीही पातळी ठरवली नसल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.)*

<><><><><>

इराणबरोबरच्या युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. सेन्सेक्समध्ये दिवसअखेर २ हजार ९४६ अंकांची वाढ झाली आणि तो ७७ हजार ५६३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ८७४ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ९९७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

भोंदू बाबा अशोक खरातला आणखी एका बलात्कार प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी नाशिक जिल्हा न्यायालयानं दिली आहे. २०२० पासून धार्मिक विधींच्या नावाखाली आपलं वेळोवेळी लैंगिक शोषण त्यानं केल्याचा आरोप तक्रारदार महिलेनं केला आहे. खरात विरुद्धच्या आरोपांची चैकशी करणाऱ्या विशेष तपास पथकानं आज त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केलं. तेव्हा मुख्य न्यायदंडाधिकारी बी एन इचपुरानी यांनी हा आदेश दिला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायन्ट्स यांच्यातला सामना दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर थोड्याच वेळात सुरु होईल.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून दिल्ली कॅपिटल्सने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधुने आज मलेशियाच्या वोंग लिंग चिंग हिला हरवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सिंधुने तिला १५-२१, २१-११, २१-१९ असं पराभूत केलं. भारताचा आयुष शेट्टी यानेही स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

केला आहे. आता त्याचा सामना चीनी तैपेईच्या के ची यू जेन याच्याशी होईल. भारताच्या लक्ष्य सेनला, हाँगकाँगच्या ली चेक यू विरुद्ध पराभव पत्करावा लागला. महिला एकेरीत मालविका बनसोड आणि तन्वी शर्मा याही पराभूत होऊन स्पर्धेबाहेर पडल्या आहेत.

<><><><><>

सांगलीत आज अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनोईंग आणि कयाकिंग अजिंक्यपद स्पर्धेची सांगता झाली. या स्पर्धेत पुरुष आणि महिला गटात १९ पदकांची कमाई करून अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठानं विजेतेपद पटकावलं. मोहालीच्या चंदीगड विद्यापीठानं उपविजेतेपद राखलं तर स्पर्धेचं आयोजन करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाला २ पदकांवर समाधान मानावं लागलं.

//<><><><><>//